Impact Factor – 6.261 Special Issue - 123 A Feb. 2019 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal

Multidisciplinary International E-research Journal


## Historiography : Recent Trends in History Writing - Local History of Khandesh

Organized by

The Shendurni Secondary Education Co-op. Society's

**Appasaheb R. B. Garud Arts, Commerce and Science College,**

Shendurni, Tal. Jamner, Dist. Jalgaon.



■ GUEST EDITOR ■

**Principal Dr. Vasudeo R. Patil**

■ EXECUTIVE EDITOR ■

**Dr. Prashant S. Deshmukh**

■ ASSOCIATE EDITOR ■

**Mr. Mahesh R. Patil**

■ CHIEF EDITOR ■

**Mr. Dhanraj T. Dhangar**

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

**For Details Visit To :** www.researchjourney.net

Scanned by CamScanner

S| P.16

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor** - (SJIF) – 6.261
**Special Issue 123A :** Historiography : Recent Trends in History Writing - Local History of Khandesh
**ISSN :** 2348-7143
**Feb. 2019**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

SPONSORED

**National Multidisciplinary Conference**

Organzied by

The Shendurni Secondary Education Co-op. Society's

# Appasaheb R. B. Garud Arts, Commerce and Science College,

SHENDURNI, Tal. Jamner, Dist. Jalgaon, Maharashtra, India 424204

NAAC Reaccredited B (CGPA 2.58)
The Best College Award (Consoloation) (NMU, Jalgaon)

ISO 9001-2008
"A" Grade in Academic Audit (NMU, Jalgaon)

On

# Historiography : Recent Trends in History Writing - Local History of Khandesh

**14th February, 2019**

- Jointly Organised By -
**Department of History**

- Chief Patron -

**Hon'ble Shri Dadasaheb Sanjayrao Bhaskarrao Garud**
Chairman, The Shendurni Secondary Edu. Coop Society Ltd. Shendurni

**Hon'ble, Prof. (Dr.) P. P. Patil**
Vice Chancellor, KBCNMU, Jalgaon

**Hon'ble Prof. (Dr) P. P. Mahulikar**
Pro Vice Chancellor, KBCNMU, Jalgaon

- Patron -

**Hon'ble Shri. Sagarmalji M. Jain** (Secretary)

**Hon'ble Shri. Dipak K. Garud** (Joint Secretary)

**Hon'ble Shri U. U. Patil** (Director)
The Shendurni Secondary Education Coop Society Ltd. Shendurni

- Chief Guest -

**Hon'ble Shri. B. B. Patil** (Registrar, KBCNMU, Jalgaon)

**Hon'ble Dr. Arunchandra Pathak** (Sr. Consultant, ICHR, WRO, Pune)

**Hon'ble Principal Dr. Shyam Kayande** (Nagpur)

- Organizer -

**Principal Dr. Vasudeo R. Patil**

**Prof. N. S. Sawale** (Vice Principal)

**Dr. Sanjay W. Bhole** (Vice Principal)

- Coordinator -

**Dr. Sujata C. Patil**
**Mr. Amar V. Jawale**

**Dr. Rohidas D. Gaware**
**Dr. Yogita P. Chaudhari**

- Co-Coordinator -

**Dr. Dhamma H. Dhargave**
**Dr. Vasant N. Patange**

**Dr. Ajinath N. Jivrag**
**Mr. Hitendrakumar R. Garud**

Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 123A : Historiography : Recent Trends in History Writing - Local History of Khandesh
ISSN : 2348-7143 Feb. 2019

# INDEX



| No. | Title of the Paper's and Author's | Page No. |
|---|---|---|
| ०१ | सविनय कायदेभंग चळवळीत शेंदुर्णी गावातील जनसामान्यांचे योगदान<br>प्रा.डॉ. दिनेश रामदास महाजन | ००१ |
| ०२ | छोडो भारत आंदोलनात शेंदुर्णी गावातील जनसामान्यांचा सहभाग<br>प्रा.डॉ. दिनेश रामदास महाजन | ००४ |
| ०३ | वेल्हाळे मंदिर – एक अभ्यास<br>रश्मी भिरूड | ००७ |
| ०४ | व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून शेंदुर्णीचा रथोत्सव : एक ऐतिहासिक परंपरा<br>प्रा. डॉ. योगिता पांडुरंग चौधरी | ०१४ |
| ०५ | पाणी संवर्धनासंदर्भातील तीन महत्त्वपूर्ण शिलालेख (शेंदुर्णी व शेंदुर्णी परिसर, ता. जामनेर, जि. जळगांव संदर्भात)<br>प्रा.डॉ. प्रशांत एस. देशमुख | ०१६ |
| ०६ | खानदेशातील भूदान चळवळ (धुळे जिल्हा)<br>प्रा. डॉ. वसंत श्रावण देसले | ०१८ |
| ०७ | एरंडोलचा स्थानिक इतिहास<br>प्रा.डॉ. बालाजी विठ्ठलराव पवार | ०२० |
| ०८ | एरंडोल विभागाचा स्थानिक इतिहास<br>प्रा.डॉ. मीना नामदेवराव काळे | ०२३ |
| ०९ | के की मुस यांचा जीवन परिचय<br>कुणाल आधार महाजन | ०२७ |
| १० | खान्देश वस्तुसंग्रहालय जळगाव येथील पवार घराण्याच्या वस्तू व शस्त्रास्त्राचा परिचय<br>प्रा.व्ही.के. साळुंखे, प्रा.एस.ए. बेडसे | ०३० |
| ११ | सातपुड्यातील आदिवासी पावरा जमातीचे पारंपारीक उद्योग, व्यवसाय : एक अभ्यास<br>प्रा. गावीत यशवंत चेमा, डॉ. संजय जिभाऊ पाटील | ०३२ |
| १२ | भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अमळनेरमधील जनतेचे योगदान<br>प्रा. अवित रघूनाथ पाटील | ०३५ |
| १३ | नर्मदा बचाव आंदोलन व खानदेशातील सुप्रसिध्द कायदेतज्ज्ञ ॲड. निर्मलकुमार सुर्यवंशी<br>श्री. भूषण शांताराम वानखेडे | ०३७ |
| १४ | अण्णासाहेब दत्तात्रय वामन पाटील यांच्या सामजिक कार्याचा ऐतिहासिक अभ्यास<br>प्रा. जी. एन. पाटील | ०४१ |
| १५ | खानदेशाचे ऐतिहासिक महत्व<br>प्रा. ए. एम. काळबांडे | ०४४ |
| १६ | ग्रामिण भागातील पारंपरिक खेळांचा इतिहास<br>प्रा. महेश आर. पाटील | ०४६ |
| १७ | स्थानिक इतिहास व वस्तुसंग्रहालय<br>प्रा. प्रफुल ह. इंगोले | ०४८ |
| १८ | भारतीय स्वातंत्र्य चळवळीत शिंदखेडा तालुक्यातील स्त्रीयांचे योगदान<br>प्रा. अमृत निंबा वळवी | ०५० |
| १९ | रामचंद्र भिकाजी गुंजीकर : चिकित्सक अभ्यास<br>प्रा. रवी सुभाषराव सातभाई | ०५३ |
| २० | मराठा कालखंडातील खानदेशचा इतिहास<br>श्रीमती देवकर रेखा चिंतामण | ०५५ |





Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 123A : Historiography : Recent Trends in History Writing - Local History of Khandesh
ISSN 2348-7
Feb. 2019

# पाणी संवर्धनासंदर्भातील तीन महत्त्वपूर्ण शिलालेख (शेंदुर्णी व शेंदुर्णी परिसर, ता. जामनेर, जि. जळगांव संदर्भात)

प्रा.डॉ. प्रशांत एस. देशमुख
इतिहास विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक, अ.र.भा.गरुड महाविद्यालय, शेंदुर्णी, ता.जामनेर, जि.जळगांव

पाण्याचे नियोजन आणि पूर्तता करण्यासंदर्भातील आज जेवढ्याप्रमाणात दक्षता घ्यावी लागते तेवढी दक्षता उत्तर मराठा कालखंडातही जाम तालुक्यात घेतली जात होती. या संदर्भात मोराड ता. जामनेर, शेंदुर्णी ता. जामनेर आणि हरेश्वर पिंपळगांव (ता. पाचोरा) येथीलतीन शिलालेख याच प्रम आहेत.

**I) मोराड, ता. जामनेर, जि. जळगांव येथील बारव शिलालेख (१)**

**१) गांव –** जळगांव जिल्ह्यातील जामनेरतालुक्यातील मोराडहे गांव पाचोरा – जामनेर तालुक्याच्या सीमाभागातील गांव आहे. मोराडच्या जवळ मोठे ठिकाण शेंदुर्णीहोय. पाचोरा – जामनेर नॅरोगेज वरील शेंदुर्णीस्टेशनपासून०८कि.मी अंतरावर मोराड गांव आहे.

**२) शिलालेख प्राप्तीस्थळ –** मोराड गावालगत मोराड शिवारात गट नं. १३३ मध्ये अरूण आनंदा गोविंदा पाटील यांच्या मालकीच्या शेतात बा आहे. बारव एका वस्तीची अथवा मोठ्या जनसमुहाची गरज पुर्ण करत असते. उताराचे क्षेत्र लक्षात घेऊनही बारव बांधण्यात आलेली आहे. बारवासाठी(बांधका वापरात आलेला दगडस्थानिक ठिकाणचा नाही. या बारवेच्या दक्षिण भागात बारवेच्या सर्वात वरील शिलेवर(२)हा शिलालेख आहे.

**३) शिलालेख वर्णन –** बारवेंचा आकार आयाताकृती आहे. बारवेचा आकार १८ x १८ x ३० आहे. बारवं निर्मितीसाठी वापरण्यात आलेला द अखंड काळसर आहे. बारवं बांधकामात (खडक पाषाण) आहे. त्या भागात (खालील टप्प्यात) जाणीवपुर्वक पाण्यासाठी आठ आगम मार्ग (In-let wa ठेवण्यात आला आहे. पुर्व बाजूला शहर बसविण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था आहे. दोन दगड जोडण्यासाठी Clomp Joint पध्दतीचा वापर करून दोन द जोडण्यासाठी लोखंडाचातसेच चुन्याचा वापर करण्यात आला आहे. दगडाची Joint System वापरण्यात आली आहे.पाण्याच्या पाझराबरोबर माती खडकाचे कण विहीरीत पडू नयेत म्हणून Inverted Filler type चा वापर करण्यात आलेला आहे.बारवेच्या दक्षिण बाजूला सर्वात वरच्या शिले बारवाच्या आतील बाजूने तीन ओळीचा शिलालेख कोरीव स्वरूपात आहे. त्याखाली ३३ आकाराच्या शिलावर एक उठावदर्शक शिलालेखहोता. पण शिला आठ ओळीचाअसावा. त्यातील उपलब्ध शिलालेख उभ्या स्वरूपात भंगलेला आहे. शिलालेखाच्या तिसऱ्या ओळीचे पहिले – दुसरे अक्षर नष्टझा आहे. शिलालेखाची घडवणूक ठसठसीत आहे.

**४) शिलालेखाची लिपी –** शिलालेखाची लिपी देवनागरी आहे.उत्तर पेशवाई काळातीलहा लेख आहे.'र' ची नोंद 'ती' अशी घेतली जाते.

**५) शिलालेखातील ग्रामनाम –** शिलालेखात मौजे मोराडचा उल्लेख दोन वेळा आलेला आहे.

**६) शिलालेखातील कालोल्लेख –** शिलालेखात विकारी नाम संवत्सर १६४१ अर्थात (१६४१ + ७८ = १७२९) इ.स.१७२९ हे वर्ष उल्लेखी आहे. (फाल्गुन वद्य १०)

**७) शिलालेख वाचन –**

ओळ :

१. शिलालेख ६ x ०.७५ x ३ फुट आहे.

२. १६४१ विकारी नामसंवत्सवर मास फाल्गुन शुक्र १० वाजता.

३. पानीदिन पाजावे जपून प्रयोजे मौजे मौराड कानीथ निवासी गतम.

**II) गोमुख – सोमसुत्र पूर्नरस्थापना शिलालेख (३) शेंदुर्णी जि. जळगांव**

शेंदुर्णी – शेंदुर्णी ता. जामनेर जि. जळगांव स्थान २०° ३५ उत्तर ७५° ३५ पूर्व अक्षांश – रेखांश आहे. पाचोरा जामनेरच्या मध्यवर्ती ठिक शेंदुर्णीहोय. शेंदुर्णी त्रिविक्रम मूर्ती, सर्वात मोठा वराह व सोननदीच्या दक्षिण तटावर विश्वेश्वराचे हेमाडपंथी मंदिर आहे.मंदिरात अंतरमंडपाच्या उजव्या बाजू भिंतीत १६ ओळींचा एक शिलालेख आहे. यातील फक्त १,१० ते १४ अशा ६ ओळीतीलच काही अक्षरेस्पष्ट आहेत. सोननदीच्या एका किनाऱ्याव समाधीस्थळे आहेत.चक्रधर स्वामीच्या पदस्पर्शाने पावन झालेले मंदिर शेंदुर्णी येथे आहेत. शेंदुर्णी – बिलवाडी रस्त्याच्या डाव्या बाजूला गोमुख आहे ठिकाणच्या शिवमंदिराच्या व्दारावर दर्शनी भागात शिलालेख आहे.

**१. शिलालेख प्राप्तीस्थळ –** शेंदुर्णी येथेसोननदीच्या डाव्या काठावर गट नं ४०४ मध्ये सुनिल सुधाकर साने यांच्या मालकीच्या शेतात गोमुख आहे. आज तो बंद अवस्थेत आहे. नदीच्या काठावर १५ – १८ फुट उंच घाट वजा बांधकाम आहे.येथे नदीच्या पात्राच्या पातळीस समांतर कुंड आहे. कुं साधारणपणे ४० x ५० x ४० फुट आहे.या कुंडाच्या तीन बाजूने वरच्या मजल्यावर कमानीयुक्त वरांडा आहे. बांधकाम पूर्णत: चुना मातीत आहे. या गोमुख कुंडाच्या बाजूला घूमटवजा शिवमंदिर आहे.( २० x २० फुट ) चौथऱ्यावर अधारीत बांधकाम आहे.मंदिराच्या समोर नंदिमंडप आहे. नंदिमंडपात वरच्या बाजूला घुमटाच्या आतूनसतीशिला दर्शविली आहे.मंदिर बांधकाम पूर्णत दगडात आहे.बांधकाम शैली उत्तर पेशवाई काळातील आहे.शिवमंदिर पूर्वाभिमुख आहे. मंदिराचे व्दार दगडी आहे. व्दारावर गणेशपट्टी आहे. व्दाराच्या बाजूला उठावदार अक्षरात २.५ x २ फु ट आकाराचा शिलालेख आहे. शिवमंदिरा शिवपीडी शिवाय अन्यमुर्ती नाही. मंदिराच्या बाह्यबाजूला बाह्यबाजूने नागफणा आहे. दोन नागफना दरम्यान हत्ती – मोर इ.प्राणी कोरलेले आहेत. मंदिराचा चौथरा ३.५ फुट उंचीचा आहे.

**२. शिलालेख –** शिलालेख ०५ ओळीचा आहे.लांबी २.५ रुंदी x २.० फुट आहे अक्षर उठावदार आहेत. शिलालेखाची सुरूवात श्री पासून होते शिलालेखाची भाषा मराठी आहे.

**३. वाचक(४) –** प्रस्तुत शिलालेख संशोधक आणि श्री यादवराव कंदकुर्तीकर मु.पो. कंदकुर्ती जि. निजामाबाद (आं.प्र) यांनी संयुक्तरित्या केले आहे.

**४. शिलालेख काळ –** शिलालेखात शके १६८५ सु ( स्व:) भानु नाम संवत्सरे असा उल्लेख असून शिलालेख १६८५– १९३४ – २४९ व प्रस्तुत मंदिर आणि गोमुख पूर्नरस्थापना करण्यात आली आहे. शके १९३४ अर्थात इ.स. २०१२ – २४९ – १७६३ इ.स. असा काळ शिलालेखात वर्णीत



Scanned by CamScanner

ISSN : 2348-7143
Feb. 2019

तो.

५. **शिलालेखाचा विषय** – गोमुख कुंडाच्या जिर्णोध्दारासमयी शिलालेख मंदिरावर बसविण्यात आल्याची नोंद घेणारा प्रस्तुत शिलालेख आहे.

६. **मूळवाचक** –

ओळ क्र.

१ श्रीगणेशायनम:वृषभा
२. चैव सोमसुत्र पूर्नवषीयच उचस्थ
३. विभंचैव सोमसुत्र पूर्नस्थापयतिणां
४. भकितजना अर्पयंतीस्थो नीला बिडो
५. शके १६८५ सु (स्व) भानु नाम सवत्सरे।।

७. **शिलालेख विश्लेषण** –

हे शंकराचे स्थान आहे.प्रथम गणेश नमन केले आहे.वृष चंदहे शंकराचे नांव व त्याच्या जटेतून जलरूपाने पाणी पडत आहे.तसेचहे स्थल महिमा वर्णीत आहे.येथील नादुरूस्तसोमसुत्र – पुन्हा जलवर्षाव उचस्थ म्हणजे उत्तमरितीने पडत राहण्यास हे (नवे) सोमसुत्र (गोमुख) पुन्हा स्थापन केले आहे. व्यक्तिनाम निर्देशनहा शब्द असावा ! शेवटच्या ओळीत शक वर्ष १६८५ ( + ७८) – १७६३ हे इ.स. वर्ष येते.

**सारांश**

शेदुर्णी प्राचिन वस्तीचे गांव. याचे प्रमाण येथील विश्वेश्वर मंदिर राष्ट्रकुट चालुक्य कालीन त्रिविक्रम मुर्ती पंचक्रोशितील २४ मंदिरे यादवकालीन शिलालेख हा विश्वेश्वर मंदिरात आहे.(५) प्रस्तुत शिलालेख उत्तर पेशवाईच्या काळातील आहे. पेशव्यांच्या काळातहे गांव पेशवाने उपाध्याय पाटणकर – दीक्षित यांच्याकडे दिले होते. यांच्या जहागिरीच्या काळात प्रस्तुत जिर्णोध्दार झाला असाला!

**निष्कर्ष**

प्रस्तुत शिलालेख उत्तरपेशवाईच्या काळात शेंदुर्णी भागात गोमुख जिर्णोध्दाराची माहिती देतो. पाण्याच्या आजच्या दुर्भिक्षकाच्या काळात आज ही या गोमुखाच्या जिर्णोध्दाराची आवश्यकता आहे.इ.स.१९८० च्या दशकापर्यंत गोमुखसुस्थितीतहोते.पाण्याच्या पातळी घटली, विहीरी व कुपनलिकांची संख्या वाढली तद्स्तव गोमुख –सोमसुत्र बंद पडले.एक सुदर स्थापत्याचा नमुना म्हणून गोमुख शेंदुर्णीचा उल्लेख करता येईल प्रस्तुत मंदिरसोमसुत्र असणारी जमीन के.मा.ना.काळासाहेब यांच्या वारदाराकडे आज आहे.

**हरेश्वर पिंपळगावयेथीलपायरी लेख**

उपलब्ध स्थळ : हरिहरेश्वर मंदिर, पिंपळगांवता.पाचोरा, जि. जळगांव

| | | |
|---|---|---|
| लांबी | : | १५ मीटर, ९ इंच : ४९.८६ फुट |
| रुंदी | : | ९ इंच : ०.६५ |
| भाषा | : | मराठी |
| लिपी | : | देवनागरी |
| काळ | : | शके १९४१ |
| प्रारंभ | : | ऊँश्री |
| स्थल उल्लेख | : | कुऱ्हाड |
| व्यक्तिनाम उल्लेख | : | श्रीधर .. देव, रामभाऊ रामचंद्र जोशी, नथु कुन्ता पाटील, दगडूशिंपी, वद पंचाळ, पांडू गोविंदा माळी, श्री समर्थ (रामदास स्वामी) केशव दगडू |
| लेख वाचन | : | !! ऊँश्रीहरिहरेश्वराय नम: या फरशीचे काम शके १८४१ त झाले त्यात मेहनत व लक्ष घालणारेसदगृहस्य मे मामलेदारसो. श्रीधर, आर.टी, देव, जहागीरदार सीताभ्रतार श्रीधर यांच्या तर्फे मुकत्यार, रा.रामभाऊ रामचंद्रजोशी यांनी जहागीरीचे उत्पन्नातून खर्च रूपये २५०० शे केला.३ जमाखर्च लिहीण्याचे काम रा. नथु कुन्ता पाटील यांनी केला ४ बाकी कामात लागणारी सर्व सिध्दता व देखरेख देवराव मरडाजी पाटील यांनी केली ५ कारागीर कुऱ्हाडकर रामभाऊ, दगडूशिंपी, वद पंचाळ, ब्राम्हण व मंडळी, दगड पाडणारे पांडु गोविंदा माळी व मंडळी।। |

*।। देह त्यागिता किर्ती मागे उरावी*
*मनासज्जना हेचि क्रिया धरावी ।।*

श्रीसमर्थाचे म्हणण्यावरून पुढे रा – केल्या कामास कोणी आश्रम देतील अशी आशा आहे.रा -- त्यांनी वाड्यातील – फरशीचे प्रमुख खर्चाने केला.

लेखक केशव दगडू. पं. मिस्त्री पतर दिले

**संदर्भ सूची**

१. शिलालेख फोटो
२. शिलालेख वाचन प्रत्यक्ष १० डिसेंबर २००९
३. गोमुखसोमसुत्र शिलालेख फोटो दि. २३.१०.२०११.
४. यादवराव कंदकुर्तीकर, कंदकुर्ती जि. निजामाबाद (आं.प्र)
५. चौधरी, डॉ.कि.का (संपा) जळगांव जिल्हा दर्शनिका विभाग, महाराष्ट्रराज्य,१९९४, पृ. ८१३
६. हरेश्वर पिंपळगांव ता. पाचोरा जि.जळगांव प्रत्येक्ष भेट व शिलालेख वाचन २५नोव्हेंबर २०१०.

Scanned by CamScanner